

गुलाम हैदरः समाधानी माणूस

खजांचीः गुलाम हैदरनी बक्षिसात मागितली एक सायकल

१९४१मध्ये पडद्यावर आलेल्या *खजांची* या चित्रपटाशी निगडित अनेक मनोरंजक घटना आणि किस्से...

□ इसाक मुजावर

आज तरुणी विमानदेखील चालवतात. पण एक जमाना असा होता की तरुणींनी सायकल चालवावी ही कल्पनाही अनेकांना सहन व्हायची नाही. १९४१चा पंचोली आर्ट पिक्चर्सचा *खजांची* हा चित्रपट यामुळेच वादग्रस्त ठरला होता. यात 'सावन के नजारे है हा, हा हा हा...' असं गाणं गात पिकनिकला चाललेल्या तरुणी सायकल चालवताना दाखवल्या होत्या. तोवर सायकलस्वार तरुणी हिंदी चित्रपटात कधीच दिसली नव्हती. यामुळेच *खजांची*मधील या तरुणी पाहून लाहोरमधील अनेक सनातनी मंडळींची माथी भडकली आणि त्यांनी चित्रपटगृहातील खुर्च्यांची मोडतोड केली.

अनेक चित्रपट आज संगीतावर चालतात आणि गाण्यांच्या कॅसेटच्या विक्रीतून चित्रपटाचा निर्मिती खर्च अनेकदा वसूल होतो. याची सुरुवात झाली *खजांची*पासून. या चित्रपटाचा निर्मिती खर्च होता साठ हजार रुपये. तो त्याच्या ध्वनिमुद्रिकांच्या विक्रीतून मिळणाऱ्या रॉयल्टीतून वसूल झाला. गुलाम हैदर या चित्रपटाचे संगीतकार होते आणि ते तेव्हा पांचोली आर्ट पिक्चर्समध्ये मासिक पगारावर नोकरी करत होते. *खजांची*च्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिकांच्या विक्रीतून मिळालेल्या रॉयल्टीचा आकडा पाहून पांचोली त्यांच्यावर एकदम खूश झाले आणि त्यांना बोलावून सांगितलं, '*खजांची*मधील तुमच्या संगीताने मला चांगलाच पैसा मिळवून दिला आहे. यासाठी मला तुम्हाला काहीतरी बक्षिसी द्यायचीय. जे मागायचं असेल ते अगदी निःसंकोचपणे मागा.'

पांचोली तेव्हा इतके खूश होते की *खजांची*च्या संगीतातून त्यांना मिळालेल्या रॉयल्टीतील काही रक्कम गुलाम हैदरनी मागितली असती तरी तीदेखील त्यांनी त्यांना उदारपणे दिली असती. पण गुलाम हैदरनी पंचोलींकडे तेव्हा मागून मागून काय मागितलं तर एक रॅली सायकल. ती मागताना पंचोलींना त्यांनी सांगितलं, 'घरातून तुमच्या स्टुडिओत पायी येताना व जाताना मला फार त्रास होतो. हा त्रास कमी व्हावा म्हणून मला एक रॅली सायकल बक्षीस द्या.'

रॅली सायकलची किंमत तेव्हा होती अवघी ऐंशी रुपये. गुलाम हैदरना स्वतःची किंमत तेव्हा कळलेली नव्हती, यामुळे ऐंशी रुपयांच्या सायकलवर त्यांनी तेव्हा समाधान मानलं. पण स्वतःची किंमत त्यांना कळली तेव्हा संगीतकारांची किंमत त्यांनी एकदम गगनाला नेऊन भिडवली. १९४५च्या के. असीफ दिग्दर्शित *फूल* चित्रपटाला संगीत देण्यासाठी के. असीफनी गुलाम हैदरना सर्वात प्रथम लाहोरहून मुंबईला आणलं आणि लाहोरहून मुंबईला येताना *फूल*च्या संगीतासाठी गुलाम हैदरनी के. असीफ यांच्याकडून पंचवीस हजार रुपये घेतले. एका चित्रपटाच्या संगीतासाठी एवढी मोठी रक्कम कोणाही संगीतकाराला तोवर मिळालेली नव्हती. यामुळे गुलाम हैदर यांच्या भाग्याचा अनेकांना तेव्हा हेवा वाटू लागला होता.

पार्श्वगायिका शमशाद बेगम १९७०च्या *हीर रांझा* या चित्रपटापर्यंत आपल्या चित्रपटात गात होती. १९४१चा

खजांची तिच्या गाण्याला ओळख मिळवून देणारा पहिला चित्रपट. त्याआधी *यमलाजट* या पंजाबी चित्रपटात ती गायली होती. पण *खजांची*पासूनच तिच्या गाण्याचं युग खऱ्या अर्थाने येथे सुरू झालं आणि या चित्रपटात गुलाम हैदर यांच्या संगीतात तिने गायलेल्या गाण्यांनीच नंतरच्या काळात हिंदी चित्रपट संगीतात आपलं युग निर्माण करणाऱ्या एका गायिकेला गाण्याची प्रेरणा दिली. ती गायिका कोण माहीत आहे तुम्हाला? भारतरत्न लता मंगेशकर.


प्राण

खजांची पडद्यावर आला तेव्हा लताबाई पुण्याला राहत होत्या. *खजांची*ने पुण्याच्या ग्लोब सिनेमात (आताचं श्रीनाथ) रौप्य महोत्सव साजरा केला. या निमित्ताने पुण्यातील गायक-गायिकांसाठी यातील गाण्यांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. लताबाईंनी या स्पर्धेत भाग घेतला होता आणि *खजांची*तील शमशादचं एक गाणं गाऊन पहिला नंबर मिळवला.


लता मंगेशकर


जानकीदास

*खजांची*त एकूण नऊ गाणी होती. या नऊ गाण्यांतील 'एक कली नाजों की पली...', 'लौट गई पापन अंधियारी...', 'मन धीरे धीरे रोना...', 'मोहे भाभी ला दो भईया...', 'मोरी चुडियां आयेगी आली रंगारंगवाली...', 'पीने के दिन आये पिये जा...' ही सहा गाणी शमशादची सोलो गाणी होती. 'सावन के नजारे है...' व 'दिवाली फिर आ गयी सजनी...' ही दोन गाणी शमशादने कोरसबरोबर गायली होती आणि 'नयनी के बात की रीत अनोखी...' हे गाणं गुलाम हैदर यांच्याबरोबर. या गाण्यांपैकी 'दिवाली फिर आ गयी सजनी...' हे गाणं आपल्या चित्रपटातील दिवाळीचं पहिलं लोकप्रिय गाणं. दिवाळीचा सण हिंदूंचा सण. पण हिंदूंच्या या सणाचं *खजांची*चं हे गाणं गायलं होतं शमशाद बेगम या मुस्लीम गायिकेने. मुस्लीम संगीतकार गुलाम हैदर यांनी हे गाणं स्वरबद्ध केलं होतं. मुस्लीम गीतकार वलीसाहेब यांनी हे गाणं लिहिलं होतं. या गाण्याचं हे एक वेगळं वैशिष्ट्य होतं आणि त्याचबरोबर आणखी एक वैशिष्ट्य होतं. दिवाळीच्या सणाचं महात्म्य सांगणारं हे गाणं असलेला *खजांची* लाहोरला निर्माण झाला होता.


शमशाद बेगम

वलीसाहेब *खजांची*चे केवळ संगीतकार नव्हते, लेखकदेखील होते. हॉलीवूडच्या *द वे ऑफ ऑल फ्लॅश* या इंग्रजी चित्रपटापासूनच प्रेरणा घेऊन वलीसाहेबांनी *खजांची*ची कथा लिहिली होती. पण कथेपेक्षा गुलाम हैदर यांचं संगीतच या चित्रपटाचं सर्वात मोठं आकर्षण ठरलं होतं. पंजाबी लोकसंगीत व ढोलकचा ठेका या चित्रपटातूनच सर्वात प्रथम हिंदी चित्रपटात आला.

*खजांची*चे दिग्दर्शक होते मोती बी. गिडवानी, ते परदेशातून चित्रपटकलेचं प्रशिक्षण घेऊन आले होते. यामुळे ते फॉरिन रिटर्न म्हणून ओळखले जायचे. रमोला या चित्रपटाची नायिका होती. ती जन्माने ज्यू होती. तिचं खरं नाव होतं रेचल कोहेन. *ग्रहेर फेर* या बंगाली चित्रपटाद्वारा चित्रपटात येताना तिने रमोला हे नाव घेतलं. ठेंगण्या बांध्याची रमोला कितपत चालू शकेल याची अनेकांना सुरुवातीला शंका वाटत होती, पण *खजांची*ने तिला रातोरात लोकप्रिय करून टाकलं. यात तिने पंजाबी पेहराव परिधान केला होता. *खजांची*च्या लोकप्रियतेमुळे रमोलाचा पंजाबी पेहराव *खजांची* ड्रेस या नावाने लोकप्रिय झाला.

*खजांची*त रमोलाचे नायक होते, एस. डी. नारंग. *दिल्ली का ठग, बंबई का चोर, अनमोल मोती* हे साठच्या दशकातील चित्रपट आजही अनेकांना आठवत असतील. एस. डी. नारंग या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. चाळीसच्या दशकात ते आपल्या चित्रपटातील एक नायक होते. *खजांची* नंतर काही काळ नायक म्हणून त्यांना बऱ्यापैकी लोकप्रियता मिळाली होती. एम. इस्माइलनी *खजांची*ची शीर्षक भूमिका केली होती. मनोरमा म्हटल्यावर आपल्याला एक गलेलठ्ठ स्त्री आठवते. चाळीसच्या दशकात हीच मनोरमा हिंदी चित्रपटातील एक रूपवती अभिनेत्री होती. *खजांची*त तिने नायकाच्या बहिणीची भूमिका केली होती. गलेलठ्ठ शरीरयष्टीचा एक हास्यअभिनेता *खजांची*त होता. त्याचं नाव दुर्गा मोटा. त्याच्या शरीराच्या अगडबंब आकारामुळेच त्याच नामकरण मोटा असं करण्यात आलं होतं. त्याला आपलं शरीर सांभाळून सरळ चालता यायचं नाही. यामुळे पंचोलीनी त्याला घरातून स्टुडिओत आणण्यासाठी व काम झाले की स्टुडियोतून घरी परत जाण्यासाठी एक टांगा ठेवला होता, दररोज चार आणे भाड्यावर!

जानकीदास आजही चित्रपटात दिसतात. *खजांची* त्यांचा पहिला चित्रपट. ते तेव्हा सायकलिंगमध्ये विश्वचॅम्पियन होते. *खजांची*मधील भूमिका यामुळेच त्यांना मिळाली होती. या चित्रपटातील त्यांची भूमिका सायकल चॅम्पियनची होती. हिंदीतील प्रसिद्ध खलनायक प्राण *खजांची*त एकाच दृश्यात पडद्यावर दिसला होता.

१९४१च्या *खजांची*च्या कथेवरून निर्माते-दिग्दर्शक पी. एन. अरोरा यांनी १९५८ला *खजांची* या नावाचाच आणखी एक चित्रपट बनवला. तर १९६२ला दत्ता धर्माधिकारी यांचा *क्षण आला भाग्याचा* हा मराठी चित्रपटही *खजांची*पासूनच प्रेरणा घेऊन बनवण्यात आला. १९४१च्या *खजांची*मधील एम. इस्मतलची भूमिका १९५८च्या *खजांची*त बलराज साहनींनी केली होती आणि *क्षण आला भाग्या*चात राजा परांजपेनी.